**पाहिजेत पाहिजेत**

➡ निर्व्यसनी व केन्द्रात राहुन काम करणारे निवासी कंपाऊंडर, कर्मचारी व कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत, भोजन+निवास फ्रि, संपर्क व्हॉटसअप करा 8208445814.8668908936

➡ जळगांव जिल्ह्यात व शहरात किराणा, डेअरी, मॉल इत्यादी ठिकाणी जाऊन तुप व श्रीखंड विक्रीसाठी सेल्समन (पुरुष/महिला) पगार दरमहा (१२000 फिक्स+PF+पेट्रोल कि.मी प्रमाणे+भत्ता+ इंसेन्टिव्ह) भेटा वेळ ११ ते 0४ अर्जासह पुनम एजन्सी, राजाराम मंगल कार्यालय, काऊ कोल्हे शाळेजवळ, जुने जळगांव.

➡ REQUIRE TALLY ACCOUNTANT किमान SALARY Rs.15000 Contact 7875447663



शिल्पकार विकासाचा...

# देशदूत



रु.55 प्रति किलो कालीमुछ चावल
रु.55 प्रति किलो बासमती चावल
रु.50 प्रति किलो चिनौर चावल
रु.80 प्रति किलो चना दाल
रु.105 प्रति किलो तुवर दाल
रु.3100 क्विंटल एम.पी का शरबती गेहुँ

हॉटेल, मेस, किराणा व घरगुतीसाठी घरपोच सुविधा व रिपलेसमेन्ट उपलब्ध

**अवतार ट्रेडिंग कंपनी** एम-१०५, एम.आय.डी.सी., किरण पाईप के पिछे, जळगांव, मो.9850379271



इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक १२९ । सोमवार, दि. ५ मे २०२५ । पाने - ८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## संपादकीय

### पर्यटनपूरक पाऊल

दिवस उन्हाळी पर्यटनाचे आहेत. तसेही अलीकडच्या काळात पर्यटनाला चांगले दिवस आले आहेत. परिणामी तिन्ही ऋतूत कुठल्या ना कुठल्या ठिकाणी पर्यटनप्रेमींचे पर्यटन सुरुच असते. ते अधिक सुरक्षित आणि सुखदायी व्हावे, अशीच पर्यटकांची अपेक्षा असते. त्याच उद्देशाने 'महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल' तथा 'पर्यटन मित्र' स्थापन करण्याचा निर्णय सरकारने नुकताच जाहीर केला आहे. पर्यटकांची सुरक्षा हा त्यामागचा प्रमुख उद्देश असल्याचे आणि त्या बरोबरीने पर्यटन स्थळांविषयी माहिती पुरवण्याचे काम हे मित्र करतील, असेही सरकारकडून सांगण्यात आले. पर्यटन हा जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. एकदा तरी फिरायला जाण्याची प्रत्येकाची इच्छा असतेच. पर्यटनातून रोजगार निर्मिती होते. राज्याच्या अर्थव्यवस्थेत भर पडते. अनेकांना उदरनिर्वाहासाठी संधी निर्माण होते. म्हणून पर्यटन सुरक्षित आणि सुखदायी व्हावे ही काळाची गरज मानता येईल. पर्यटकांना होणाऱ्या अपघातांमुळे अनेक ठिकाणे बदनाम मानली जातात. नैसर्गिक आपत्तींमुळे अपघात होऊ शकतात. तथापि बऱ्याचदा पर्यटकांचा अतिउत्साह त्यांच्या अंगाशी आल्याचे दिसते. 'काही होत नाही...', अशी बेफिकिरी दाखवली जाते. सेल्फी काढणे, रिल्स बनवणे, निसरड्या किंवा पाण्याच्या ठिकाणी अनाठायी धाडस करणे; प्रसंगी जीवाशी खेळ ठरु शकते. तशा घटना अधून-मधून घडतात. सरकारच्या नियोजित उपक्रमातील 'पर्यटन मित्र' तो धोका पर्यटकांच्या लक्षात आणून देऊ शकतील. प्रसंगी अटकाव करण्याचा प्रयत्न करु शकतील. अर्थात त्यांचे प्रयत्न प्रभावी ठरणे पर्यटकांच्याच सहकार्यावर अवलंबून असेल. अनेक पर्यटनस्थळी धोक्याच्या सूचना देणारे फलक लावलेले असतात. स्थानिक लोक सूचना करतात. किती पर्यटक ते मनावर घेतात? तेव्हा, अशा पुढाकारामागचा उद्देश पर्यटकांनी लक्षात घेण्याची गरज आहे. पर्यटनस्थळांची माहिती सर्वांना असतेच असे नाही. सर्वच ठिकाणी मार्गदर्शकांची सुविधा उपलब्ध असू शकेल असे नाही. ती उणीव सरकारी 'पर्यटन मित्र' दूर करु शकतील. अनेकदा पान २ वर »

# पाकिस्तानवर वॉटर स्ट्राईक

## सिंधूनंतर चिनाब नदीवरील प्रकल्पाचे पाणी अडवले



**नवी दिल्ली ।** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला त्याची जागा दाखवण्यासाठी सर्व बाजूंनी मुस्कटदाबी सुरू केली आहे. सिंधू पाणी वाटप करार रद्द केल्यानंतर वुलर सरोवराचे पाणीही पाकिस्तानसाठी बंद केले. आता त्यापुढे जाऊन चिनाब नदीवर असलेल्या बागलीहार प्रकल्पाचे पाणी अडवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा पाकिस्तानसाठी आणखी एक धक्का असल्याचं सांगितलं जातंय.

जम्मू-कश्मीरमधील बागलीहार जलविद्युत प्रकल्प पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तानमधील वादाचा केंद्रबिंदू ठरला आहे. भारताने सिंधू पाणी वाटप करार रद्द केल्यानंतर आता चिनाब नदीचे पाणी बागलीहार धरणाद्वारे रोखण्याचा निर्णय घेतला आहे.

### बागलीहार धरणातून पाणी रोखले

भारताने जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर ही कारवाई केली आहे. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर भारताने १९६० पासून सुरू असलेली आणि जागतिक बँकेच्या मध्यस्थतेत झालेली सिंधू पाणी वाटप करार रद्द केला आहे. जम्मूच्या रामबनमध्ये असलेल्या बागलीहार प्रकल्पातील पाण्याचे वहन नियंत्रित करण्याची भारताकडे क्षमता आहे. तसंच, झेलम नदीवर असलेल्या किशनगंगा प्रकल्पासंदर्भातही भारत लवकरच कडक निर्णय घेण्याच्या तयारीत आहे.

### बागलीहार प्रकल्पावरुन दीर्घकालीन वाद

बागलीहार धरण हा भारत आणि पाकिस्तानमधील अनेक वर्षांपासूनचा वादाचा मुद्दा आहे. पाकिस्तानने यापूर्वीही याबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेषत: जागतिक बँकेकडे मध्यस्थतेची मागणी केली होती. त्याचप्रमाणे, किशनगंगा प्रकल्पामुळे नीलम (झेलमची उपनदी) नदीच्या प्रवाहावर होणाऱ्या परिणामांविषयीही पाकिस्तानने आक्षेप नोंदवले आहेत.

### सिंधू पाणी वाटप कराराचा इतिहास

सिंधू पाणी वाटप करार १९६० मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान ।जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे राष्ट्रपती अयुब खान यांच्या पुढाकाराने करण्यात आला होता. या करारानुसार, रावी, बियास आणि सतलज नद्यांच्या पाण्याचे अधिकार भारताच्या नियंत्रणात देण्यात आले. तर सिंधू, चिनाब व झेलम नद्या पाकिस्तानच्या नियंत्रणात राहिल्या. मात्र भारताला काही मर्यादित प्रमाणात सिंचन, वीज निर्मिती आणि घरगुती वापरासाठी पाण्याचा वापर करण्याची मुभा देण्यात आली होती.

# दादा-भाईंमध्ये शितयुद्ध

## कार्यक्रमांमधील गैरहजेरीचे उट्टे काढण्याचा प्रयत्न



**सातारा ।** राज्याच्या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांमध्ये राजकीय शीतयुद्धाला सुरुवात झाल्याची चर्चा रंगू लागली आहे. कारण काल उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसकडून आयोजित करण्यात आलेल्या माजी मुख्यमंत्र्यांच्या सन्मान सोहळ्याला विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दांडी मारली. या कार्यक्रमातील एकनाथ शिंदे यांच्या गैरहजेरीवरून अजित पवारांनी जाहीरपणे नाराजी व्यक्त केली. त्यानंतर पवार यांनी आपली नाराजी दर्शवण्यासाठी एक पाऊल पुढे टाकत शिवसेनेचे नेते आणि मंत्री शंभूराज देसाई यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमालाही जाणे टाळल्याचं पाहायला मिळालं आहे. राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज पान २ वर »

### शिंदेंनी शब्द डावलल्याने नाराजी?

राष्ट्रवादी काँग्रेसकडून राज्यातील माजी मुख्यमंत्र्यांच्या सन्मान सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. राजकीय पक्षाकडून या सोहळ्याचं आयोजन करण्यात आलेले असल्याने आम्ही उपस्थित राहू शकत नाही, अशी भूमिका महाविकास आघाडीत असलेल्या माजी मुख्यमंत्र्यांनी घेतली. मात्र महायुतीत असलेले आणि राज्याच्या मुख्यमंत्रिपदी राहिलेले एकनाथ शिंदे या कार्यक्रमाला उपस्थित राहतील, अशी राष्ट्रवादीची अपेक्षा होती. परंतु शिंदे यांनी स्वत: या कार्यक्रमाला जाण्याऐवजी आपल्यावतीने प्रताप सरनाईक यांना प्रतिनिधी म्हणून सदर सोहळ्याला पाठवले. तुम्ही येणार नसाल तर प्रतिनिधीही पाठवू नका, असे म्हणत अजित पवार यांनीही एकनाथ शिंदेंवर जाहीरपणे नाराजी व्यक्त केली होती.

# नृसिंह अवताराने भाजपाचे खलत्व नष्ट होणार!

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची टीका



**परभणी ।** भक्त प्रल्हादाची जी भक्ती आहे तशीच भक्ती काँग्रेस जनांच्या आचार, विचार आणि उच्चारातून दिसत आहे. आपण काँग्रेस काँग्रेस म्हणत आहोत तर दुसरा रावणाचा छळणारा विचार आहे तो पक्षांतर करा म्हणतो, आमचेच बरोबर आहे हे सांगतो. भक्त प्रल्हादाच्या भक्तीने नृसिंहाचा अवतार झाला तसाच नृसिंह अवतार ईव्हीएम किंवा बॅलेट पेपरमधून होईल आणि राक्षसरूपी भाजपाचे खलत्व नष्ट केल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला.

सामाजिक सलोखा व सद्भाव वाढीस जावा यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली परभणीत आज सद्भावना पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते आ. सतेज पान २ वर »

## पाच मोठ्या बँकांना लाखोंचा दंड

**नवी दिल्ली ।** देशातील पाच मोठ्या बँकांवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने कारवाई केली आहे. पाच बँकांना लाखो रुपयांचा दंड ठोठावला आहे. यामध्ये देशातील आघाडीच्या आयसीआयसीआय बँक, ॲक्सिस बँक, आयडीबीआय बँक, बँक ऑफ बडोदा आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांचा समावेश आहे. कोणत्या बँकेवर किती दंड आकारण्यात आला. सायबर सुरक्षा फ्रेमवर्क, केवायसी, क्रेडिट आणि डेबिट कार्डवरील काही सूचनांसह इतर कारणांसाठी बँकांना दंड आकारण्यात आला आहे.

# देशाला जे हवे तेच होणार!



### संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचे सूचक विधान

**नवी दिल्ली ।** संरक्षण मंत्री म्हणून माझ्या सैनिकांसह देशाच्या सीमांची सुरक्षा सुनिश्चित करणे ही माझी जबाबदारी आहे. पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळात तुम्हाला जे हवे तेच होईल असा सूचक इशारा केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दिला आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दिल्लीतील बकरवाला आनंदधाम आश्रमातील सनातन संस्कृती जागरण महोत्सवाला हजेरी लावली. या व्यासपीठावरुन संरक्षणमंत्र्यांनी पहलगाम हल्ल्याबद्दल पाकिस्तानला थेट इशारा दिला. राजनाथ सिंह पुढे म्हणाले की, देशाविरोधात कारवाया करणाऱ्यांना योग्य उत्तर देणे, ही माझी जबाबदारी आहे. तुम्ही सर्वजण आपल्या पंतप्रधानांना चांगले ओळखता, तुम्हाला त्यांच्या कामाच्या शैलीची माहिती आहे, त्यांच्या दृढनिश्चयाचीही चांगली जाणीव आहे. मी तुम्हाला खात्री देतो की, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली देशाला जे हवे आहे, तेच होईल, असे सूचक विधान संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केले. २०४७ पर्यंत भारत विकसित राष्ट्र बनेल राजनाथ सिंह पुढे म्हणतात, तुम्हाला सर्वांना माहिती आहे की पंतप्रधान मोदींनी २०४७ पर्यंत संपूर्ण देशाला विकसित राष्ट्र बनवण्याचे लक्ष्य ठेवले आहे. स्वाभाविकच, हे ध्येय छोटे नाही, पण तुम्ही निश्चिंत राहा, हे ध्येय साध्य होईल. आता आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भारताची प्रतिष्ठा वाढली आहे. पूर्वी, जेव्हा जेव्हा भारत आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर पान २ वर »




# बिहारसाठी राजद-काँग्रेसमध्ये एकमत

**पाटणा ।** बिहार विधानसभा निवडणूक २०२५ च्या अखेरीस होणार असली तरी त्याचे पडघम आतापासून वाजू लागले आहेत. केंद्र सरकारनं आगामी जनगणनेत जातीय गणना करण्याचा निर्णय देखील बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घेतल्याचं म्हटले जात आहे. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेसमध्ये एकमत झाले असून २४३ जागा लढविण्याचा निर्णय महागठबंधनच्या बैठकीत घेण्यात आल्याची माहिती खा. मनोज झा यांनी दिली.

बिहार विधानसभा निवडणूक या वर्षाच्या शेवटी होईल. राजकीय पक्षांनी आतापासूनच तयारी सुरु केली आहे. महागठबंधनमधील सहभागी पक्षांची तिसरी महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर राजद नेते राज्यसभा खासदार मनोज झा यांनी महागठबंधन एकत्रितपणे निवडणूक लढणार असल्याचं सांगितलं. पान २ वर »

# मी गावी आलो की मुंबईत तापमान वाढते-एकनाथ शिंदे

**महाबळेश्वर ।** राम शिंदे म्हणाले महाबळेश्वरला आले की टेम्प्रेचर कमी होतं. पण मी गावाला आलो की इकडे टेम्प्रेचर कमी होतं आणि मुंबईत वाढतं असे वक्तव्य करत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना टोला लगावला. विरोधक याच्या बातम्या करतात, मी मात्र याचा आनंद घेतो. आता पाहिले असेल की मी इकडे का येतो. निसर्ग आहे इकडे अस एकनाथ शिंदे म्हणाले.

महाबळेश्वरमध्ये महापर्यटन उत्सव २०२५ समारोप सोहळा आयोजीत केला होता. यावेळी एकनाथ शिंदे बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. शिंदे पुढे म्हणाले की, स्थानिक लोकांना इथेच रोजगार मिळावा अशा प्रकारची भूमिका आपल्या सरकारची आहे. महापर्यटन महोत्सव पर्यटनाला चालना देईल असेही एकनाथ शिंदे म्हणाले. इकडचे वातावरण आगळे वेगळे आहे. मी कालपासून अनेक स्टॉलला भेट पान २ वर »

# पाकिस्तानी चॅनेल बंद म्हणजे बदला होतो का?

## पहलगामवरुन खा.संजय राऊत यांचा सरकारवर निशाणा



**मुंबई ।** जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याला बारा दिवस होऊन गेलेत. मात्र अद्याप बदला काय घेतला? रोज बातम्या येतात, या नाड्या आवळल्या, त्या नाड्या सोडल्या २१ पाकिस्तानी युट्यूब चॅनल बंद केले, याला बदला घेणं म्हणतात का? असा संतप्त सवाल शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांनी सरकारला विचारला आहे. दहशतवादी हल्ल्यात २७ लोक मारले गेल्यावर बदला कसा पाहिजे हे बघण्यासाठी इंदिरा गांधींचा इतिहास बघा असा सल्लाही त्यांनी देत भाजपवर टिकास्त्र डागले आहे.

ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांनी आज खा. शरद पवार यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाध साधला. राऊत पुढे म्हणाले की, प्रधानमंत्री इकडून तिकडे, तिकडून इकडे फिरत आहेत. मिठ्या मारत आहेत. लोकांना याला बदला घेणं म्हणत नाही. भीती वाटते मला या देशाची. आता अशा प्रकारचे राज्यकर्ते या देशात असतील आणि शत्रू इतका समोर माजलेला पान २ वर »

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1875 |
| नवती (२) | : 1675 |

मिश्कीली




# राम नाईक यांचा मत्सोद्योग समितीचा राजीनामा



**मुंबई ।** उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल व माजी केंद्रीय मंत्री राम नाईक यांनी मत्स्योद्योग विकास धोरण समितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. नाईक हे प्रकृतीच्या कारणास्तव अध्यक्षपदावरून पायउतार झाल्याचे सांगण्यात आले. नाईक यांनी आपला राजीनामा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर केला. फडणवीस यांनीही त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे. प्रकृती अस्वस्थ्य असताना राजीनामा प्रत्यक्ष घेऊन येऊ नका. मीच माझा प्रतिनिधि पाठवितो, असे काल मुख्यमंत्र्यांनी नाईक यांना दूरध्वनीवर सांगितले. त्यानुसार आज त्यांच्यावतीने आलेल्या प्रतिनिधीकडे त्यांनी राजीनामा सुपूर्द केला असून मुख्यमंत्री त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे. राम नाईक हे भाजपाचे निष्ठावान नेते असून ते केंद्रात मंत्रीदेखील होते.

# राहुल गांधी हिंदू धर्मातून बहिष्कृत

## स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांची बद्रीनाथमध्ये घोषणा

**देहरादून ।** ज्योतिर्मठ शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी लोकसभा विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांना हिंदू धर्मातून 'बहिष्कृत' केले आहे. राहुल गांधी यांनी संसदेत मनुस्मृतीवर भाष्य करताना 'सनातन धर्माचा अपमान' केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या संदर्भात तीन महिन्यांपूर्वी स्पष्टीकरण मागितले होते, पण राहुल गांधींनी उत्तर दिले नाही, असेही ते म्हणाले.

बद्रीनाथ येथील शंकराचार्य आश्रमात ही घोषणा करण्यात आली. राहुल गांधी यांनी संसदेत भाषण करताना मनुस्मृती 'बलात्कार करणाऱ्यांचे संरक्षण करते' असे विधान केले होते. त्यानंतर शंकराचार्यांनी राहुल गांधी यांच्याकडून उत्तराची तीन महिने वाट पाहिली. त्यांनी राहुल गांधींना स्मरणपत्रही पाठवले, पण काहीच उत्तर आले नाही, असे ते म्हणाले.



शंकराचार्य म्हणाले, राहुल गांधींनी आपल्या भाषणात आधी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना लक्ष्य केले. नंतर मनुस्मृतीवर टीका केली. मनुस्मृती हा आमचा धर्मग्रंथ आहे. सत्ताधारी पक्षाच्या बाकांकडे बोट दाखवत गांधी म्हणाले की, 'तुमच्या पुस्तकात' असे लिहिले आहे. याचा अर्थ ते स्वतःला हिंदू मानत नाहीत. जो माणूस मनुस्मृतीला आपला ग्रंथ मानत नाही, तो हिंदू असू शकत नाही.

### मंदिरांमध्ये प्रवेश बंदी

राहुल गांधी हिंदू धर्माच्या विरोधात वागत आहेत, असा आरोप शंकराचार्यांनी केला. आम्ही निर्णय घेतला आहे की त्यांना मंदिरांमध्ये प्रवेश बंदी करावी. कोणत्याही पुजाऱ्याने त्यांच्यासाठी पूजा करू नये, असे ते म्हणाले.

# बारावीचा निकाल आज जाहीर होणार

**मुंबई ।** बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची माहिती समोर आली आहे. सोमवारी ५ मे रोजी बारावीचा निकाल जाहीर होणार आहे. दुपारी एक वाजल्यापासून विद्यार्थ्यांना ऑनलाईन निकाल पाहता येणार असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दिली आहे. या वर्षी बारावी बोर्डाच्या परीक्षा ११ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२५ या कालावधीत घेण्यात आल्या होत्या. त्यासाठीची प्रात्यक्षिक परीक्षा त्यापूर्वी २४ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२५ दरम्यान घेण्यात आल्या होत्या. परीक्षेसाठी सुमारे ८.१ लाख विद्यार्थी, ६.९ लाख विद्यार्थिनी आणि ३७ ट्रान्सजेंडर विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. आमच्या न्यूजलेटरसाठी साईन-अप करा ठशसळींशी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता बारावी परीक्षेचा निकाल जाहीर करण्याची तयारी पूर्ण केल्याची माहिती दिली आहे. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, पान २ वर »